Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Time Serial Rights

# पुढच्या जन्मी तोच नवरा हवा... पण

माझ्या हिंदू धर्माचा मला जाज्वल्य अभिमान आहे.

म्हणून जन्मोजन्मी हाच नवरा मिळावा

अशी मी दर वटपौर्णिमेला देवाला प्रार्थना करते.

मग आणखी थोड्या मागण्या मागते.

“हे देवा माझ्या याच नवऱ्याला पुढच्या जन्मी थोड्या वेगळ्या स्वभावाचा बनव.

त्याला माझाच स्वंयपाक चवदार वाटुदे.

सर्व स्त्रियात त्याला मीच सुंदर दिसूदे.

शॉपिंगमध्ये त्याला इंट्रेस्ट निर्माण होउदे.

मी पैसे उधळले तरी ‘आपली बायको किती काटकसरी आहे !’

असा त्याचा समज होऊ दे.

हे देवा, मुलं सांभाळण्याची त्याच्यात आवड निर्माण होउदे.

घर कितीही अस्ताव्यस्त असलं तरी

त्याला ते व्यवस्थित दिसू दे.

थोडक्यात

“आपली बायको अगदी सर्वगुणसंपन्न, सुंदर स्त्री आहे.”

असं त्याला जन्मभर वाटू दे.

देवा तू असं केलंस तर

या  जन्मी आमची होतायत तशी आमची पुढच्या जन्मी भांडणं होणार नाहीत.

सगळं कसं माझ्या मनासारखं होईल

आणि आमचा संसार सुखाचा होईल."

समाप्त